# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### पनवेल महानगरपालिका अंतर्गत खारघर, कामोठे शहरात सिडकोच्या पुढाकाराने ‘रिक्रिएशन सेंटर व अद्यावत ऑडिटोरियम उभारणेबाबत

**(१) ४६७३ (१४-१२-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या पाहता नागरिकांचे राहणीमान उंचावावे म्हणून खारघर शहरात सिकडोच्या पुढाकाराने एखादे ‘इनडोअर आणि आऊटडोअर स्पोर्ट कॉम्प्लेक्स’ उभारण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधीनी केली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांसाठी मनोरंजन व विश्रांतीची जागा उपलब्ध व्हावी म्हणून खारघर व कामोठे शहरात सिडकोच्या पुढाकाराने एखादे ‘रिक्रिएशन सेंटर (Recreation Center) व अद्यावत ऑडिटोरियम (auditorium)’ उभारण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधीनी केली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ‘रिक्रिएशन सेंटर (Recreation Center) व अद्यावत ऑडिटोरियम (auditorium)’ उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०३-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) नवी मुंबई, खारघर, सेक्टर-४ मध्ये ‘ग्रंथालय + ऑडिटोरियम + सांस्कृतिक केंद्र’ या संयुक्त वापरासाठी भूखंड सिडकोने आरेखित केला असून सदर भूखंडाच्या हस्तांतर तथा विकासाबाबत प्रशासकीय कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तळीये (ता.महाड, जि.रायगड) गावाचे पुनर्वसन तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(२) ४७८९ (१९-११-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दरडग्रस्त तळीये (ता.महाड, जि.रायगड) गावाचे पुनर्वसन गत तीन वर्षांपासून प्रलंबित असून सद्य:स्थितीत या ठिकाणी ९२ घरे बांधून पूर्ण झाली असून १३५ घरांची कामे अपूर्ण असल्याची बाब दिनांक ८ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३ वर्षे पूर्ण होऊनही ग्रामस्थांना हक्काचा निवारा न मिळाला असल्याने ग्रामस्थांना कंटेनरमध्ये दिवस काढावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाड तालुक्यातील दरडग्रस्त तळीये गावातील ग्रामस्थांच्या उर्वरित घरांचे बांधकाम तातडीने पूर्ण करुन मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१२-२०२५) :** (१) मौजे तळीये येथे १३५ सदनिकांचे बांधकाम पूर्ण झाले असून ९२ सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. उर्वरीत ४३ सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(२) हे खरे नाही.
(३) उर्वरित घरकुलांचे बांधकाम जून, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर ठिकाणी रस्ता रुंदीकरण, अंतर्गत रस्ता, शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, व्यायाम शाळा, अंगणवाडी, बाजारपेठ, एस.टी. थांबा, समाज मंदिर, स्मशानभूमी, सार्वजनिक शौचालय, मलनि:स्सारण, गटार व्यवस्था इत्यादी मूलभूत सोयी-सुविधा जिल्हा परिषद, रायगड यांच्यामार्फत देण्यात आल्या आहेत. तसेच, वितरीत करण्यात आलेल्या सदनिकांना वीज जोडणी व नळ जोडणीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील धोकादायक उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने करण्याबाबत

**(३) ४८०२ (१९-११-२०२५) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या पावसाळ्यापूर्वी करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात ९६ अतिधोकादायक इमारतींपैकी एका इमारतीचा भाग माहे ऑगस्ट,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान कोसळल्याची घटना घडली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुर्घटनेमुळे दुरुस्ती मंडळाच्या अतिधोकादायक इमारतीतील रहिवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून या इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या अडीच हजार कुटुंबाचे छत धोक्यात असतानाही व अतिधोकादायक इमारतीची यादी जाहीर होऊन दोन महिने उलटले तरी तेथील २५०० कुटुंबापैकी एकाही कुटुंबाला संक्रमण शिबीरात वा सुरक्षित स्थळी हलविण्यात आलेले नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरातील धोकादायक, जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी म्हाडा अधिनियम, १९७६ मध्ये दिनांक ०२/१२/२०२२ रोजी अंतर्भूत करण्यात आलेल्या नवीन कलम ७९ (अ) नुसार अतिधोकादायक ९६ इमारतींच्या मालक / रहिवाशी यांना पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यासाठी नोटीस बजाविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१२-२०२५) :** (१) व (२) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने केलेल्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात मुंबई शहरातील एकूण ९६ इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आले असून, या अतिधोकादायक इमारतींची यादी विविध वर्तमानपत्रातून माहे मे २०२५ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर ९६ अतिधोकादायक इमारतीत एकूण २५७७ भाडेकरु / रहिवाशी आहेत. भाडेकरू / रहिवाशांची पर्याय व्यवस्था संक्रमण शिबिरात करण्याची कार्यवाही मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सुरू आहे.
(३) मुंबई शहरातील धोकादायक, जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी म्हाड अधिनियम, १९७६ मध्ये दिनांक ०२/१२/२०२२ रोजी नवीन कलम ७९ (अ) अंतर्भूत करण्यात आले आहे.

त्यानुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत अतिधोकादायक घोषित केलेल्या ९६ इमारतीपैकी ८० इमारतीच्या मालकांना नविन कलम ७९अ मधील तरतुदीनुसार नोटीस बजावून, पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर करण्यास कळविले आहे. परंतु सद्य:स्थितीत कलम ७९-अ अंतर्गत बजाविलेल्या नोटीसी विरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.३४७७१/२०२४, दाखल केली आहे.सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २८/०७/२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये कलम ७९-अ अंतर्गत केलेल्या कार्यवाहीला स्थगिती दिली आहे.

सदर आदेशाविरुध्द स्थगिती मिळविण्याकरीता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत मा.सर्वोच्च न्यायालयात एसएलपी दाखल करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिवभोजन केंद्र चालकांची थकीत देयके अदा करण्याबाबत

**(४) ४८०७ (२७-११-२०२५) श्री.सचिन अहिर, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.संजय खोडके, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१९ मध्ये गरीब व गरजुंसाठी सुरु केलेल्या शिवभोजन थाळी योजनेनुसार राज्यात कार्यरत असलेल्या २२५८ केंद्रांपैकी सद्य:स्थितीत १८८४ इतकी शिवभोजन केंद्रे कार्यरत असून त्याव्दारे गोरगरीब कामगार, स्थलांतरीत विद्यार्थी व इतर सर्व सुमारे २ लाख गरजू नागरिकांना मिळत असून ९००० कुटुंबियांना रोजगार मिळून त्यांचा उदरनिर्वाह होत असल्याचे दिनांक २५ ऑगस्ट,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर मध्ये त्याची १३४ एवढी केंद्र संख्या मंजूर असून दररोज तिथे चौदा हजार थाळयांचे वितरण होते परंतु अनुदानाअभावी नागपूर जिल्ह्यातील केंद्र चालकांच्या आर्थिक अडचणीमुळे शासनाकडे निवेदन दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शिवभोजन योजनेची देयके मागील आठ महिने मिळाली नसल्यामुळे केंद्रे चालविणे अशक्य झाले असून केंद्रांतील कामगारांना पगार, थाळी बनविण्यासाठी लागणारे साहित्य व इतर खर्चासाठी केंद्रचालकांना वेळप्रसंगी दागिने गहाण ठेवून, बाजारातून व्याजाने कर्ज घेऊन हा खर्च भागवावा लागत आहे तसेच पुणे व पिंपरी चिंचवड शहरामधील ४० केंद्रांचे रुपये दोन कोटी एवढी रक्कम थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने २०० कोटीं रुपयांची थकबाकी देण्याचा निर्णय घेऊनही शासनाने अपुरी तरतूद केल्याचे व त्यापैंकी या योजनेसाठी केवळ प्रत्यक्षात केवळ २१ कोटीची देयके मंजूर करण्यात आली असून या केंद्राचे थकीत अनुदान लवकरात लवकर देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.अन्न व नागरीपुरवठा मंत्री यांना पत्र लिहून केंद्रचालकांचे थकीत देयके अदा करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, गरीबांचा आधार असणारी शिवभोजन थाळी योजना बंद करण्याचा शासनाचा मानस असून यामुळे राज्यातील गोरगरीब जनतेची होणारी परवड लक्षात घेऊन सदरहू योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत तसेच शिवभोजन केंद्र चालकांचे थकीत देयके अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०५-१२-२०२५) :** (१) अंशत: हे खरे आहे.

गरीब व गरजुंसाठी जानेवारी, २०२० मध्ये शिवभोजन थाळी योजना सुरु केली आहे व सद्य:स्थितीत राज्यात १८७४ शिवभोजन केंद्र कार्यरत आहेत.
(२) होय, हे खरे आहे.

तथापि, नागपूर शहरामध्ये कार्यरत शिवभोजन केंद्रांची संख्या १६२ असून दररोज सुमारे पंधरा हजार थाळयांचे वितरण होते.

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात नागपूर जिल्ह्यातील शिवभोजन केंद्राकरीता एकूण रुपये ६,७१,५७,०००/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता एकूण रक्कम रुपये ७०.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी शासन निर्णय दिनांक ०४/०७/२०२५ अन्वये रक्कम रुपये २१.०० कोटी, शासन निर्णय दिनांक २६/०९/२०२५ अन्वये रक्कम रुपये २१.०० कोटी असा एकूण रुपये ४२,००,००,०००/- इतका निधी माहे एप्रिल-२०२५ ते सप्टेंबर-२०२५ या कालावधीत व शासन निर्णय दिनांक ०७/११/२०२५

अन्वये उर्वरित निधी रक्कम रुपये २८.०० कोटी उप नियंत्रक शिधावाटप कार्यालये तसेच सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर देयकाचे प्रदान उक्त कार्यालयाच्या स्तरावरुन केले जाते.
अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांना रक्कम रुपये १,५०,५३,०००/- इतका निधी वितरित करण्यात आला असून त्यापैकी रक्कम रुपये ८५,६४,१२०/- खर्ची पडला असून, रक्कम रुपये ६४,८८,८८०/- इतका निधी अखर्चित आहे.

तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे यांना रक्कम रुपये १,५२,२७,०००/- इतका निधी वितरित करण्यात आला असून त्यापैकी रक्कम रुपये ४२,१४,७००/- खर्ची पडला असून, रक्कम रुपये १,१०,१२,३००/- इतका निधी अखर्चित आहे.
(४) व (५) शिवभोजन योजनेकरीता सन २०२५-२६ साठी रक्कम रुपये ७०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद मंजूर असून, संपूर्ण निधीचे उपरोक्तप्रमाणे वितरण करण्यात आले आहे.

माहे डिसेंबर-२०२५ च्या हिवाळी अधिवेशनात शिवभोजन योजनेकरीता रक्कम रुपये १९७.९१ कोटीची पुरवणी मागणी वित्त विभागास सादर करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मनोरी (मुंबई) येथे समुद्राचे खारे पाणी गोडे करणाऱ्या निर्जलीकरण प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(५) ४८३१ (१९-११-२०२५) श्री.सचिन अहिर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वाढत्या लोकसंख्येची पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मनोरी येथे समुद्राचे खारे पाणी गोडे करणारा निर्जलीकरण (Desalination) प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहरातील वाढती पाणीटंचाई लक्षात घेता, सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होणार आहेत व प्रत्येक प्रकल्पातून दररोज किती खारे पाणी गोडे करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदर प्रकल्प अंधेरी आणि मालाड परिसराच्या पाणीपुरवठ्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण असून मुंबईकरांची वाढती पाण्याची गरज पूर्ण करणे आणि भविष्यात पाणीटंचाईचा सामना करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईची पाण्याची वाढती गरज भागविण्याकरीता समुद्राचे खारे पाणी गोड करण्यासाठी मनोरी (मुंबई) येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत्त नि:क्षारीकरण प्रकल्प उभारण्याची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-१२-२०२५) :** (१) हे, खरे नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे समुद्राच्या क्षारयुक्त पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्यासाठी नि:क्षारीकरण प्रकल्प उभारण्याकरीता फेब्रुवारी २०२१ मध्ये महानगरपालिकेची मान्यत देण्यात आली

आहे. सदर प्रकल्प बांधकामाकरीता ४८ महिने कालावधी अपेक्षित आहे. यातून प्रतिदिन २०० द.ल.प्र. इतके गोडे पाणी उपलब्ध होईल.
(३) हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकल्पातून मालाड परीसरात पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.
(४) सदर प्रकल्पाची आवश्यकता विचारात घेता महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रीया राबविण्यात येत असून निविदेस प्रतिसाद प्राप्त झाला आहे. यापुढील कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत कंत्राटदारांची सुरक्षा ठेव सुनिश्चित करणे व विहित वेळेत परत करणेकरिता नियमावली तयार करण्याबात

**(६) ४८६२ (१४-१२-२०२५) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभागअंतर्गत कंत्राटदारांची सुरक्षा ठेव नियमानुसार परत करणेबाबत विलंब होत असल्याच्या अनेक तक्रारी असून गत २ वर्षात नागपूर विभागात अशी अनेक प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एका प्रकरणात १५ दिवसांची ठेव तर दुसऱ्या प्रकरणात १५ महिन्यांची ठेव असे वेगवेगळे नियम लावले जात असल्याबाबत वृत्तपत्रात बातमी देखील प्रसिध्द झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुरक्षा ठेव सुनिश्चित करणे तथा या प्रकरणी सर्वसमावेशक प्रक्रिया निश्चित करणे करीता शासनाने नियमावली तयार करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२५-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी शासन निर्णय / परिपत्रकानुसार संबंधित कंत्राटदारांना अनामत रक्कम विहित वेळेत परत करण्याची कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा नियोजन समितीवर सन २०२५-२६ या वर्षाकरीता सदस्यांची नेमणूक करणेबाबत

**(७) ४८८० (१४-१२-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा नियोजन समितीवर सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी शासनाकडून अद्यापही १८ सदस्यांची नेमणूक झालेली नसल्यामुळे सदर समितीच्या माध्यमातून विविध विकासयोजनांची

अंमलबजावणी करण्यासाठी समस्या उद्‌भवत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजन समितीला रुपये रुपये १२०० कोटी एवढ्या रक्कमेचा निधी मंजूर झाला असून माहे जुलै महिन्यापर्यंत तो निधी प्राप्त न झाल्यामुळे अनेक विकास कामे प्रलबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत निधीचे वाटप करण्याच्या दृष्टीने सदस्यांची नेमणूक करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

नागपूर जिल्हा नियोजन समितीवर सदस्यांच्या नेमणूकीचा प्रस्ताव अंतिम करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्ह्यातील विविध विकास योजनांबाबत अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत नागपूर जिल्ह्या साठी रुपये १०४७.०० कोटी इतका नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे. माहे डिसेंबर,२०२५ अखेर एकूण रुपये ८३८.२६ कोटी रक्कमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मंजूर नियतव्यया पैकी डिसेंबर,२०२५ पर्यंत रुपये ६२८.०० कोटी (६० %) व जानेवारी, २०२६ मध्ये उर्वरित रुपये ४१९.०० कोटी (४० %) इतका निधी या प्रमाणे सद्य:स्थितीत संपूर्ण १०० % निधी वितरित करण्यात आला आहे. विहीत वेळेत निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून, निधी अभावी कोणतीही विकास कामे प्रलंबित नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्याची पदे रिक्त असल्याबाबत

**(८) ४९११ (१४-१२-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागात अभियंत्यांची ४६२ पदे रिक्त असून एवढ्या मोठ्या प्रमाणात तांत्रिक अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने पायाभूत सुविधांच्या कामास समस्या निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागातील रिक्त पदे भरणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२५-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

विभागात अभियंत्यांची सरळसेवेची तसेच, पदोन्नतीची पदे काही प्रमाणात रिक्त आहेत. मात्र या पदांचे अतिरिक्त कार्यभार विभागातील अन्य अभियंत्यांकडे सोपविण्यात आले असल्याने कामकाज सुरू आहे.

(२) रिक्त पदांपैकी सरळसेवेच्या कोट्यातील ३४८ रिक्त पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. तसेच, पदोन्नतीच्या कोट्यामधील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गतची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(९) ५१४१ (२०-११-२०२५) डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकसह राज्यातील आठ शहरांमध्ये गत नऊ वर्षापूर्वी सुरु केलेल्या स्मार्ट सिटी प्रकल्पांपैकी एकूण १,५५५ कोटी एवढया रक्कमेची कामे अपूर्ण असून, केंद्र शासनाने ३१ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास सदर योजनेस निधी देणे बंद केल्यामुळे सर्व आर्थिक भार राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांवर येत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून निधी थांबल्यामुळे सुरू असलेल्या प्रकल्पांच्या कामात समस्या निर्माण होऊन शहरी पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, पाणीपुरवठा, स्वच्छता व इतर महत्त्वाच्या सेवा पुरवठ्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निधी अभावी अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करुन राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-१२-२०२५) :** (१) केंद्र शासनाने निश्चित केलेल्या वित्तीय आकृतिबंधानुसार स्मार्ट सिटी करीता केंद्र शासन, राज्य शासन व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था हिश्श्याचा विहित निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर निधीतून मंजूर वित्तीय आकृतीबंधाच्या मर्यादेत निधी उपलब्ध असल्याने या मर्यादेतील कामांचे स्वतंत्र दायित्व शासनावर तथा महानगरापालिकेवर राहणार नाही. सबब सर्व आर्थिक भार शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांवर येत आहे, हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

स्मार्ट सिटी अंतर्गत प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांमुळे शहरी पायाभूत सुविधा वाहतूक व्यवस्था,

पाणीपुरवठा, स्वच्छता व इतर महत्त्वाच्या सेवा पुरवठ्यांवर प्रतिकूल परिणाम झाला नसून स्मार्ट सिटी मधील प्रगतीपथावरील प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सदर सेवांच्या दर्जात वाढ होणार आहे.
(३) व (४) स्मार्ट सिटी अंतर्गत प्रगतीपथावरील कामांसदर्भांत देखील उपरोक्त आकृतीबंधातील निधी विहीत पध्दतीने उपयोगात येत आहे. स्मार्ट सिटी अंतर्गत विकसित होऊन कार्यान्वित झालेल्या मालमत्ता संबंधित महानगरपालिकेस हस्तांतरित करण्याचे व हस्तांतरित झालेल्या मालमत्ता चे कार्यान्वयन, देखभाल दुरुस्ती व मालमत्ता मुद्रीकरणाकरीता संबंधित महानगरपालिकेने आर्थिक तरतूद करण्याचे शासनाच्या दिनांक २७ मार्च २०२५ च्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार स्मार्ट सिटी व संबंधित महानगरपालिका स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द धरणातील वाढत्या बॅकवॉटरमुळे निमगाव (जि.भंडारा) व परिसरातील ग्रामस्थांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१०) ५१४६ (१७-१२-२०२५) श्री.संजय केणेकर, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोसीखुर्द धरणात मुसळधार पावसामुळे बॅकवॉटरची पातळी मोठ्या प्रमाणात वाढली असल्यामुळे भंडारा जिल्ह्यातील पहेला परिसरातील निमगाव आणि त्यांच्या आसपासच्या खालच्या भागात वास्तव्यास असलेल्या ग्रामस्थांपुढे धोक्याची स्थिती निर्माण झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरातील ग्रामस्थांनी पुनर्वसनाची मागणी अनेक वेळा केली असूनही प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही न केल्यामुळे वाढत्या पाण्यामुळे गावकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची नोंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील पहेला परिसरातील निमगाव आणि त्यांच्या आसपासच्या खालच्या भागात वास्तव्यास असलेल्या ग्रामस्थांचे जीव व मालमत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी ग्रामस्थांचे वेळीच पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

माहे ऑक्टोबर-२०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात गोसीखुर्द जलाशयाची सरासरी पाणी पातळी २४४.९० मी. इतकी होती व नदीतील विसर्ग ५३२ घमी/ से. इतका होता.धरणाची पातळी गेटच्या माध्यमातून नियंत्रित केली होती. निमगाव व परीसरात कोणतीही धोक्याची स्थिती निर्माण झाली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांमधील पाण्याची गळती रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(११) ५२६५ (१९-११-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून दररोज सुमारे चार दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो परंतु यामध्ये ३४% पाणी हे हिशोब बाह्य अर्थात नॉन रेवेन्यू वॉटर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी गळती व चोरी तसेच मीटर व देयकातील त्रुटी यामुळे पाण्याचा महसूल देखील महानगरपालिकेला मिळत नाही तसेच दररोजच्या पाणीपुरवठ्यामध्ये होणारा तुटवडा दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्ट्यांमध्ये जलवाहिन्यांमधून अवैध पाणी चोरीचे प्रकार मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे तसेच जुन्या व जीर्ण झालेल्या भूमिगत जलवाहिन्यांमध्ये गळती निर्माण होऊन सुमारे १७ ते १८ टक्के म्हणजेच ८०० दशलक्ष ली. पाणी रोज वाया जात असून, या गळतीमुळे शहरातील अनेक वस्त्यांमध्ये पाण्याचा दाब कमी होऊन पुरवठा विस्कळीत होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठ्यामध्ये होत असलेली गळती व पाणीचोरी नियंत्रित करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेमार्फत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१२-२०२५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दररोज सरासरी ४००० दशलक्ष लिटर प्रतिदिन एवढा पाणीपुरवठा केला जात आहे. त्यापैकी सन २०२४-२५ करीता ३४.४६% इतके प्रमाण विना मोबदला आढ़ळून आले आहे. मुंबईसाठी सध्या सुमारे ४६०० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाण्याची आवश्यता आहे.परंतु उपलब्ध स्त्रोतांमधून ४००० दशलक्ष लिटर प्रतिदिन इतका पाणीपुरवठा केला जात आहे.

(३) अंशत: खरे आहे.

जलवाहिन्यांमध्ये गळती निदर्शनास आल्यावर जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलणे,गळती शोधून ताबडतोब बंद करून पाणीपुरवठा विस्कळीत होणार नाही याबाबत महानगरपालिकेकडून नियमितपणे दुरूस्तीबाबत कार्यवाही करण्यात येते. तसेच जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिनींच्या गळतीतून वाया जाणा-य पाण्याचे प्रमाण निष्कर्षित करता येत नाही.

(४) बृहन्मुंबई क्षेत्रातील अनधिकृत जलवाहिन्या खंडीत करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते. तसेच पाण्याची गळती थांबविण्याकरीता जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलणे, गळती शोधून थांबविणे इत्यादी कामे नियमित पणे करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केयर म्यूनिसिपल रुग्णालय जोगेश्वरी (मुंबई) येथे प्रशासकीय कामकाजात अनियमितता झाल्याबाबत

**(१२) ५३०० (१९-११-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केयर म्यूनिसिपल रुग्णालय, जोगेश्वरी ईस्ट, मुंबई येथील रुग्णालयात प्रशासकीय गैरव्यवस्था, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तींमधील अनियमितता, खोट्या सह्या करून पगार काढणे,रुग्णांना उपचारासाठी इतर रुग्णालयात पाठविण्याची घटना तसेच अत्यावश्यक वैद्यकीय यंत्रसामग्रीचा अपुरा वापर इ. प्रकारच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जोगेश्वरी ट्रॉमा केयर रुग्णालयात बाह्य कंत्राट (आऊट सोर्सिंग पध्दतीने) पध्दतीने १०५ कामगारांची नियुक्ती करताना अनियमितता झाल्याचे तसेच कंत्राटी वैद्यकीय अधिकारी भरती प्रक्रियेत ६० ते ७० वैद्यकीय अधिकारी प्रत्यक्ष मुलाखती न घेता त्यांना सेवेत घेण्यात येत आले तसेच सदर वैद्यकीय अधिकारी कामावर उपस्थित नसताना देखील त्यांच्या खोट्या स्वाक्षऱ्या घेऊन पगार काढला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयात हृदयरोग तज्ज्ञ उपलब्ध नसल्याने गंभीर रुग्णांना केईम रुग्णालय, कूपर किंवा नायर रुग्णालय येथे उपचारासाठी पाठवले जाते, सुमारे १२ कोटी रुपये खर्च करून खरेदी केलेले डीएसए मशीन साडेचार वर्षात फक्त २११ रुग्णांसाठी वापरले गेले आहेत, सन २०२२ रोजी आमदार निधीतून व्हेंटिलेटर खरेदीसाठी निधी उपलब्ध करूनही मशीन न मिळाल्याने तो निधी परत गेला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जोगेश्वरी येथील ट्रामा केयर रुग्णालयातील होणाऱ्या अंतर्गत व्यवस्थेतील अनागोंदी कारभार, गैरव्यवहार, तसेच अनियमितिता प्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१२-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केयर म्यूनिसिपल रुग्णालय मधील बाह्य कंत्राटी कर्मचारी यांची नियुक्ती प्रक्रीयेतील अनियमितेबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने उपआयुक्त (मध्यवर्ती खरेदी खाते) यांच्या मार्फत चौकशी महानगरपालिकेच्या स्तरावर चौकशी करण्यात येत आहे.

(२) बाह्य कंत्राट पध्दतीने १०५ कामगारांची नियुक्ती तसेच ६० ते ७० वैद्यकीय अधिकारी प्रत्यक्ष मुलाखती न घेता सेवेत घेणे,त्यांच्या खोट्या स्वाक्षरी घेऊन पगार काढणे या तक्रारींच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या स्तरावर चौकशी करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही, रूग्णालयात विशिष्ठ तज्ञ उपलब्ध नसल्यामुळे गंभीर रूग्णांना प्रथमोपचारानंतर केईएम,कूपर,सायन,सेव्हन हिल्स किंवा नायर रूग्णालयात स्थंलातरीत करण्यात येते.तसेच डीएसए मशीनद्वारे २७७ रूग्णांवर न्यूरो सर्जरी प्रक्रीया करण्यात आली आहे.तथापि, सन २०२२ मध्ये आमदार निधीतून नवजात शिशू व्हेंटीलेटर खरेदीस निधी उपलब्ध होता परंतु यंत्रसामग्री प्राप्त न झाल्याकारणाने निधी

समर्पित करण्यात आला.
(४) अनियमित व प्रशासकीय बाबींच्या अनुषंगाने २२ कर्मचारी यांच्यावर बदली बाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## न्हावी (ता.यावल, जि.जळगांव) येथे स्वस्त धान्य दुकानातील तांदुळाची अवैध विक्री होत असल्याबाबत

**(१३) ५३०४ (१४-१२-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) न्हावी (ता.यावल, जि.जळगांव) येथील शासनाच्या स्वस्त धान्य दुकानातील तांदळाची काळया बाजारात चढत्या भावाने विक्री होत असल्याची घटना दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ रोजी अथवा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर शासनमान्य स्वस्त धान्य दुकानामार्फत तांदुळाची अवैध विक्री रोखण्याच्या दृष्टीचे तसेच सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०९-०२-२०२६) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील १२ उपनगरीय रुग्णातलयांमधील अतिदक्षता विभागासाठी राबविण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रियेस कंत्राटदार उपलब्ध होत नसल्याबाबत

**(१४) ५३८९ (१९-११-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील १२ उपनगरीय रुग्णालयातील अतिदक्षता विभागासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका निविदा प्रक्रिया राबवत असून या प्रक्रियेला चार वेळा मुदतवाढ देऊनही कंत्राटदार मिळत नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापुर्वी कंत्राटदाराकडून निविदेतील निकषांची पूर्तता न केल्यास वा वैद्यकीय अधिकारी गैरहजर राहिल्यास एक हजार रुपये दंडाची तरतूद होती काय, तसेच नव्याने काढण्यात आलेल्या निविदेमध्ये निकषांचे पालन न करणाऱ्या संस्थावर आकारण्यात येणाऱ्या एक हजार रुपये दंडाची रक्कम एक लाख रुपये करण्यात आल्याने कंत्राटदार निविदा भरत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निविदा प्रक्रियेचा मुख्य उद्देश रुग्णालयांमधील अतिदक्षता विभागांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे असून बृहन्मुंबई महानगरपालिकेने १२ उपनगरीय रुग्णालयांमधील अतिदक्षता विभागासाठी निविदेचे निकष कडक केल्यामुळे आणि दंड आकारण्याची तरतूद वाढविल्यामुळे

कंत्राटदारांचा स्वारस्य कमी झाल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी, प्रशासनाने आता निविदा प्रक्रियेमध्ये बदल करून पुन्हा नवीन निविदा काढण्यासंदर्भात शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१२-२०२५) :** (१), (२) व (३) हे,खरे नाही.
मुंबई शहरातील १२ उपनगरीय रुग्णालयातील अतिदक्षता विभागासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे प्रसिध्द निविदेस तीन कंत्राटदारांचे प्रतिसाद प्राप्त झाले असून निविदा प्रक्रीया अंतिम टप्प्यात आहे.या निविदेद्वारे निश्चित होणाऱ्या सेवापुरवठादारांमार्फत मनुष्य बळ उपलब्ध होणार आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम (मुंबई) रुग्णालयाच्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत

**(१५) ५४०५ (१९-११-२०२५) श्रीमती चित्रा वाघ, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील असलेल्या केईएम रुग्णालयाच्या औषध वॉर्डमध्यें सुमारे ७०० खाटा असून त्या तुलनेत रुग्णांची संख्या अधिक असल्याने दोन रुग्णांसाठी एका खाटेचा वापर केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयातील सीटी स्कॅन मशीन बंद असल्याने सदर सेवेसाठी रुग्णांना अन्य रुग्णालयात जावे लागते यासह इतर अनेक समस्यांना रुग्णांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची ४४ टक्के पदे रिक्त असून ४२१ आउटसोर्स कर्मचाऱ्यांचे करार दिनांक १५ ऑगस्ट,२०२५ रोजी संपले असून नवीन कर्मचाऱ्यांना कामावर ठेवण्यास विलंब होत असल्याने विद्यमान कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांची तात्काळ भरती करण्याची मागणी करत कर्मचाऱ्यांनी अधिक्षकांच्या कार्यालयाबाहेर निर्दशने करत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत तसेच रुग्णांना उद्भवणाऱ्या समस्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.एकनाथ शिंदे (०३-१२-२०२५) :** (१) केईएम रूग्णालयातील औषधशास्त्र विभागामध्ये मुंबई तसेच बाजुच्या अनेक जिल्ह्यातून रूग्ण येतात. रूग्णालयाच्या क्षमतेपेक्षा रूग्णांचे प्रमाण जास्त असल्याने खाटा कमी पडल्याने रूग्णांना उपचाराविना राहवे लागु नये याकरीता काही वेळा दोन रूग्णांनासाठी एका खाटेचा वापर करण्यात येतो.
(२) हे खरे नाही.

क्ष-किरण विभागात २ सीटी स्कॅन मशीन कार्यरत आहे. परंतु दिनांक २०/०८/२०२५ ते दिनांक १७/०९/२०२५ या कालावधीत नवीन सीटी स्कॅन मशीनच्या तांत्रिक अडचणींमुळे अंशत: मशीन कार्यरत होती.तसेच जुनी सीटी स्कॅन मशीन ची देखभाल दुरूस्ती करण्याची कार्यवाही सुरू होती. तथापि, दिनांक १८/०९/२०२५ पासून सर्व सीटी स्कॅन नियमित होत आहेत.

(३) हे खरे नाही.

रूग्णालयातील २११ कंत्राटी कर्मचारी यांचा करार दिनांक १५/०८/२०२५ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि, माहे सप्टेंबर २०२५ पासून दिनांक ३१/०३/२०२७ पर्यंत ४२१ कंत्राटी कर्मचारी नियुक्त करण्याबाबतचा करार महानगरपालिकेच्या स्तरावर करण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विक्रोळी (पुर्व) येथील टागोरनगर महानगरपालिका शाळेची (एस विभाग) संकुलाची इमारत धोकादायक स्थितीत असल्याबाबत

**(१६) ५४१९ (१९-११-२०२५) श्रीमती चित्रा वाघ, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (पुर्व) येथील टागोरनगर महानगरपालिका शाळा (एस विभाग) संकुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट माहे मे, २०२५ मध्ये पूर्ण झाले असून, ही इमारत शाळा भरविण्यासाठी धोकादायक ठरविण्यात आल्यामुळे त्या शाळेच्या इमारतीतील सर्व भाषिक सुमारे १८०० विद्यार्थ्यांना कन्नमवार नगर येथे स्थलांतरित करण्याचा पर्याय प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुचविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १८०० विद्यार्थ्यांना कन्नमवार नगर येथे स्थालांतरित करणे धोक्याचे असून शिवाय आरटीई २००९ चे उल्लंघन करणारे असल्याने टागोरनगर महानगरपालिका शाळा इमारतीच्या परिसरामधील डॉन बॉस्को आणि नॅशनल या खाजगी संस्थांना भाड्याने दिलेल्या खोल्या ताब्यात घेऊन त्या खोल्यांमध्ये ही शाळा भरवावी अशी मागणी बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षक सभेने महानगरपालिका शिक्षण उपायुक्तांकडे लेखी निवेदनाद्वारे केली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनावर तात्काळ निर्णय घेऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा विचार करुन शासनाने कोणती कार्यवाही केली, असल्यास, केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-१२-२०२५) :** (१) व (२) होय हे, खरे आहे.

(३) टागोरनगर महानगरपालिका या शाळेतील विद्यार्थ्यांना डॉन बॉस्को हायस्कूल,नॅशनल हायस्कूल व हरीयाली व्हिलेज सी.बी.एस.ई. शाळेत स्थलातर करण्यात आले आहे. तसेच डॉन बॉस्को हायस्कूल,नॅशनल हायस्कूल या खाजगी संस्थांना भाड्याने दिलेल्या खोल्या रिकाम्या करून त्यांमध्ये शाळा भरविण्याकरीता महानगरपालिके मार्फत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जोगेश्वरी (पूर्व) येथील स्कॉटर कॉलनीतील महानगरपालिकेच्या प्रसूतिगृहाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१७) ५४३९ (१९-११-२०२५) श्रीमती चित्रा वाघ, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी पूर्व येथील स्कॉटर कॉलनीतील महानगरपालिकेच्या प्रसूतिगृहाची दुरवस्था झाली असून पश्चिम उपनगरातील शेकडो गरजू रुग्ण तसेच प्रसूतीसाठी नावनोंदणी केलेल्या गर्भवती आणि मातांचा आधार असणाऱ्या या प्रसूतीगृहांकडे बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषधे, शस्त्रक्रियेसाठी लागणारी सामुग्री, रक्ताची उपलब्धता, सुसज्ज ओटी अशा प्रसूतिसाठी लागणाऱ्या अनेक महत्त्वाच्या सुविधांची उपलब्धता करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करीत आहे,

(३) असल्यास, या प्रसूतिगृहात बालकांच्या लसीकरणाची सुविधा असूनही अंतर्गत बांधकाम आणि वैद्यकीय सामुग्रीअभावी या सुविधेचा लाभही मुलांना मिळत नाही, पालिका प्रत्येक वर्षी रुग्णालयांसह प्रसूतिगृहांची पुनर्बांधणी तसेच अद्ययावतीकरणासाठी लाखो रुपयांचा खर्च करुनही ही नेमक्या ठिकाणी असणारी प्रसूतिगृहांच्या सुविधेकडे दुर्लक्ष होण्याची काय कारणे आहेत,

(४) असल्यास, प्रसूती सुविधा, माता बालसंगोपन या उद्देशाने जी प्रसूतिगृहे सुरु झाली त्यांच्या झालेल्या दुरवस्थेकडे पालिका प्रशासनाने लक्ष घालून, सदर दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१२-२०२५) :** (१) हे,खरे नाही.

(२) प्रसुतिगृह इमारतीचा संरचनात्मक अहवाल C-१ वर्गातील असल्याकारणाने अंतरविभाग रूग्ण तातडीने बंद करण्यात आले आहे. या इमारतीचे पाडकाम करून पुर्नबांधणी करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू आहे.तथापि, बाह्यरूग्ण विभाग केव्हस रोड दवाखाना येथे कार्यरत असून प्रसुती व पुढील उपचार हिंदू हृदयनाथ बाळासाहेब ठाकरे रूग्णालय,गोरेगाव येथे करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही, प्रस्तुत आरोग्य केंद्रामार्फत नियमित लसीकरणाकरीता पुर्वनियोजन करून माहे जानेवारी २०२५ ते माहे ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सुमारे ११०२ बालकांना लसीकरण करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील परळ लालबाग भागातील डॉ.शिरोडकर मंडईचा पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१८) ५५३६ (१९-११-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळ – लालबागमधील केंद्रबिंदु असलेल्या डॉ.शिरोडकर मंडईचा पुनर्विकास गेल्या ११

वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून दिनांक ७ मे, २०१५ रोजी सदर इमारत धोकादायक ठरवून पाडण्यात आल्यामुळे १२३ घरे व १४३ दुकाने बाधित झाली असून घरांना लालबागमधील विघ्नहर्ता इमारतीत घरे देण्यात आली तर दुकानदारांना तात्पुरत्या स्वरुपात गिरगाव खोताची वाडी तर कांहीना खटाववाडीत दुकाने देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मंडई उभारण्यासाठी ८६ कोटी रुपयांचा करार हिराणी कन्स्ट्रक्शन सोबत झालेला आहे परंतु याबाबत कोणतीही कारवाई झालेली नसून या प्रकल्पातील विलंबामुळे उपजीविकेचे साधन नसल्यामुळे तणावामुळे आतापर्यंत १८ व्यापाऱ्यांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकासकाने साहित्याचे भाव वाढल्याने १० टक्के वाढीव रक्कमेच्या मागणीस महानगरपालिकेने नकार दिल्यामुळे प्रकल्प अदयापही अपूर्णावस्थेत असून शासनाने सदर प्रकल्प पूर्ण करुन बाधित झालेल्या दुकानदारांना तात्काळ त्यांची हक्काची दुकाने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, निधीचा गैरवापर,ठेकेदारांची जबाबदारी आणि विस्थापितांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने निर्णय घेऊन या प्रकल्पाची चौकशी करून या प्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

डॉ. शिरोडकर मंडईच्या पुर्नविकासाचे काम सन २०१८ मध्ये महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. मंडईच्या इमारतीचा फेज-१ चे बांधकाम ०७ मजल्यापर्यंत पूर्ण झाले आहे. त्यामध्ये मासळी विभाग, २५ गाळेधारक व २५ गोदामधारक यांना तात्पुरत्या स्वरूपात पर्यायी जागा देण्यात आली आहे. नव्याने ४४ गाळे बांधून त्याचे परवानाधारकांना वाटप करण्यात आले आहे. २० परवानाधारक खटाववाडी मंडईमध्ये तळमजला व उर्वरीत ३४ परवानाधारकांकरीत बाबू गेणू मंडईमध्ये किऑस्क जागेच्या उपलब्धतेनुसार देण्याबाबत महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरू आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मे. हिरानी एन्टरप्रायझेस यांच्या सोबत कराराप्रमाणे १०% किंमत वाढ करण्याची तरतूद होती. परंतु कंत्राटदाराने २५% पर्यंत वाढविण्याची विनंती केली. मात्र करारनाम्याप्रमाणे अशी तरतूद नसल्याकारणाने संबंधित कंत्राटदाराची विनंती अमान्य केल्याने काम करण्यास असमर्थता दर्शविली. यास्तव मूळ कंत्राटदाराने प्रकल्प कालावधीत बांधकाम केलेले निम्न तळमजला + उन्नत तळमजला+१ ला मजला येथील पूर्ण झालेली गाळे व परिसर बाजार येथील गाळे गाळेधारकांना हस्तांतरीत करण्यात आले आहे. उर्वरीत काम पूर्ण करण्याकरीता निविदा प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका स्तरावरून सुरू आहे.
(४) महानगरपालिकेने कंत्राटदाराने केलेल्या कामाचा मोबदला दिलेला असून त्या व्यतिरीक्त कोणतीही रक्कम अदा केलेली नाही.यास्तव सार्वजनिक निधीचा गैरवापर झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निगडी प्राधिकरण (जि.पुणे) येथील परिसरात झालेल्या दुर्घटनेत मृत्यूमूखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(१९) ५८९९ (१९-११-२०२५) श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निगडी प्राधिकरण (जि.पुणे) येथील परिसरात बीएसएनएलच्या चेंबरमध्ये तीन कामगारांचा गुदमरून मृत्यू झाल्याची घटना दिनांक १५ ऑगस्ट, २०२५ रोजी घडली असून उक्त घटनेस दोन महिन्याचा कालावधी पूर्ण होऊनही या मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना अद्यापही कोणतीही भरपाई दिली गेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने राष्ट्रीय सफाई आयोगाला पाठविलेल्या अहवालात ठेकेदार आणि बीएसएनएलची चूक असल्याचे नमूद केले असून महानगरपालिकेने बीएसएनएलच्या विरोधात कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी अनुसूचित जाती जमाती आयोगाने दखल घेतल्यानंतर पंधरा दिवसांनी पोलिसांनी बीएसएनएलच्या संबंधितांवर आणि ठेकेदारावर गुन्हा दाखल केला आहे. मात्र, गुन्ह्यामध्ये नेमके कोण जबाबदार आहे, याबद्दलची माहिती पोलिसांनी अद्याप दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याबाबत व उक्त प्रकरणी कारणीभूत असणाऱ्या ठेकेदार व बीएसएनएलच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-१२-२०२५) :** (१),(२),(३),(४) व (५) पिंपरी चिंचवड शहरातील मौजे निगडी परीसरात दिनांक १५/०८/२०२५ रोजी बीएसएनएलच्या इन्स्पेक्शन चेंबरमध्ये ऑप्टीकल फायबर केबलच्या देखभाल दुरुस्तीचे काम करीत असताना तीन कंत्राटी कामगारांचा गुदमरुन मृत्यू झाला आहे.

सदर टेलिकॉम कंपनीचे केबल डक्टचे Inspection चेंबर हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अखत्यारीत नसून त्याची साफसफाईची जबाबदारी महानगरपालिकेची नाही.

मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत व घटनेस जबाबदार संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकणेची कार्यवाही बीएसएनएलशी संबंधित आहे.

याप्रकरणी ठेकेदाराविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून दिनांक १८/१०/२०२५ रोजी मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले आहे.

---

## राज्यातील अनेक क्रीडा मैदानांवरती अवैधरित्या पध्दतीने टर्फ उभारण्याबाबत

**(२०) १७८४२ (२५-०३-२०२३) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारित येणाऱ्या अनेक क्रीडा मैदानांवरती अवैध पध्दतीने टर्फ (विविध खेळांसाठी बंदिस्त जाळी) उभारण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टर्फ मध्ये खेळण्याकरीता नागरिकांकडून अवैधरित्या शुल्क आकारले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहर व मुंबई उपनगरात अशा टर्फ ची संख्या किती आहे, यासंबंधी मोहीम स्वरूपात पाहणी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अवैध टर्फ वर कारवाई करून वैध रित्या टर्फ उभारण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२७-०२-२०२६) :** (१) व (२) क्रीडा विभागाच्या नियंत्रणातील जिल्हा व तालुका क्रीडा संकुलावर टर्फ (विविध खेळांसाठी बंदिस्त जाळी) उभारण्यात आलेले नाही.विभागीय उपसंचालक, मुंबई यांच्या अखत्यारितील आझाद, क्रॉस, ओव्हेल मैदान व कुपरेज मैदानावर अशा प्रकारचे अवैध टर्फ लावण्यात आलेले नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या मैदानाबाबत शुल्काची आकारणी ही बाब स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारितील आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.